आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2019, Issue-60, Vol-03


**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)


"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganash,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

15) महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना
प्रा. डॉ. बाभुळगावकर किशन सत्ताजी, हिंगोली ||72

16) जीवन नाट्याचा आविष्कार : स्त्री गीत
डॉ. जयदेवी पवार, लातूर ||75

17) कृषिजीवनाचे वास्तव आविष्कृत करणारी ग्रामीण कविता
प्रा.डॉ. सदाशिव सरकटे, गढी ||78

18) महात्मा बसवेश्वर आणि काही संत : एक साम्य
डॉ. राजीव यशवंते, पूर्णा ||82

19) रा.रं.बोराडे यांच्या साहित्यामधील ग्रामीण जीवन
डॉ. एम. पी. खेडेकर, वाशिम ||85

20) भारतीय संगीतातील कंठसंस्काराचे महत्व
डॉ. स्नेहल दत्तात्रय शेंबेकर, अकोला ||88

21) इंदिरा संत यांच्या कविता संग्रहातील कवितांचा विचार
डॉ. देवेंद्र शेषराव तातोडे, नागपूर ||90

22) अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया: राजकीय पक्षांची वाटचाल (१९५० ते १९९०) - एक अभ्यास
श्री. जिजाभाऊ सिताराम घुले, डॉ. संजय बापुराव गायकवाड ||92

23) ॲट्रोसिटी कायदा आणि सामाजिक न्याय
प्रा.डॉ.सौ.अरूंधती पाटील, चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे, बीड ||99

24) महानुभाव संप्रदाय तत्त्वज्ञान व आचारपद्धती काल व आज
प्रा. नरसिंग कदम, उदगीर ||104

25) वसंत आबाजी डहाके : जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्व
कु. जोत्सना राऊत ||106

26) "मंजुल भगत की कहानियों में व्यवत स्त्री चेतना"
डॉ. नागराज उत्तमराव मुळे, लातूर ||109

27) राजस्थान में शिक्षा के विकास में ईसाई मिशनरियों का योगदान
अमनदीप, जयपुर ||111

28) वसुधैव कुटुम्बकम्
प्रा. रामसिंह एन. डोडिया, गिर सोमनाथ ||115



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

17

# कृषिजीवनाचे वास्तव आविष्कृत करणारी ग्रामीण कविता

प्रा.डॉ. सदाशिव सरकटे
सहयोगी प्राध्यापक,
कला व विज्ञान महाविदयालय, शिवाजीनगर गढी

***********

**प्रस्तावना :-** मराठीमध्ये ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला साधारणत: १९२० नंतर प्रारंभ झाला असे मानले जाते; कारण १९२० च्या दरम्यान 'ग्रामीण' जीवन ठळकपणे वेगळे असल्याचे जाणवू लागले होते. महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली आणि ग्रामीण जीवन, ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृतीला मुखरित करीत साहित्यिकांनी मराठी वाङमयात मोलाची भर घातली.

ग्रामीण साहित्यात गावगाड्यातील जीवन, निसर्ग, शेती, प्राणीजीवन चित्रित झालेले असते. त्या साहित्य कृतीमंधील वातावरण घटना, प्रसंग हे गावाशीच निगडित असतात. म्हणून त्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणतात. आज ग्रामीण साहित्याची चळवळ थंडावली असली तरी ग्रामीण साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे हेही तेवढेच खरे. ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, सोबतच ग्रामीण कविता विशेषत्वाने लिहिली गेली. काही कवींच्या निवडक ग्रामीण कविता कवितांच्या माध्यमातून कृषी जीवनाच्या वास्तवाचा शोध होणे हे या शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

**विषय प्रवेश -** ग्रामीण समाजरचना ही कृषिकेंद्रित आहे. कृषिजीवन हे ग्रामसंस्कृतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे जी संस्कृती निर्माण झाली ती कृषिसंस्कृती. यात इथले सण उत्सव, रुढी-परंपरा, जत्रा-यात्रा इ.कृषिशीच निगडित असल्याचे जाणवते. तसेच या संस्कृतीमधला एक महत्त्वाचा घटक म्हणजे निसर्ग. संपूर्ण ग्रामीण जीवन हे निसर्गाने वेढलेले असते. निसर्गाशिवाय ग्रामीण जीवन अपूर्ण राहते. निसर्ग आणि ग्रामीण जीवन यांचे अतूट नाते असते. ग्रामीण साहित्यातून ते आपसूकच जाणवते. "ग्रामीण साहित्य निर्माण होण्याची अपरिहार्यता व स्वाभाविकता सांगताना रा.ग.जाधव म्हणतात... 'ग्रामीणता हा मराठी जीवनाचा सनातन अंगभूत घटक आहे व होता. मराठी सारख्या जिवंत प्रगमनशील वाङ्‌मयपरंपरेला या घटकाला संपूर्णपणे डावलणे केवळ अशक्य होते.'"[१] आणि त्यामुळे ग्रामीण साहित्य जन्माला आले असे त्यांनी सुचविले आहे.

ग्रामीण कथा कादंबऱ्यांत गावगाड्याचे चित्रण करीत असताना बलुतेदारांपासून ते कृषिजीवनाशी निगडित सर्व व्यवहारांचे चित्रण आलेले आहे तसेच कवितांमधूनही व्यक्त केल्याचे आढळते. ग्रामीण कवतेचे मूळ लोकसाहित्यात सापडते. 'गाथा सातशती' या ग्रंथात ग्रामीण जीवनाचे चित्र आले आहे असे अभ्यासकांचे मत आहे. त्यांच्या मते दोन हजर वर्षापूर्वीचा ग्रामीण माणूस त्यांच्या महत्त्वाकांक्षा, स्वप्न, त्याचे श्रृंगारिक जीवन आणि एकूणच त्यांच्या जगण्यातले वास्तव यांचे दर्शन 'गाथा सप्तशती' मध्ये आढळते. तसेच संतांच्या अभंग, ओव्यां इत्यादीं मधूनही ग्रामीण जीवनाशी निगडित अशा रचना दिसून येतात. म.जोतिराव फुले यांनी अखंडमधून शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन केल्याचे दिसून येते. त्यानंतर अनेक कवींनी ग्रामीण जीवन रेखाटण्याचा प्रयत्न केला. सुरवातीच्या कवितेत ग्रामीण जीवन कल्पनेच्या आधारावर रेखाटले होते. हळूहळू बदलांना सामोरे जात वास्तव रेखाटण्याकडे कल वाढला आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण कविता लिहिली जाऊ लागली.

ग्रामीण कवितेची व्याख्या करताना डॉ.वसुदेव मुलाटे म्हणतात "ज्या कवितेत ग्रामीण जनजीवनाचे ग्रामीण माणसाच्या जाणिवांचे, त्याच्या सुखदु:खाचे, आनंदोल्लासाचे, अडीअडचणी व समस्यांचेचित्रण केलेले असते तिला ग्रामीण कविता असे म्हणता येईल."[२] अर्थातच या कवितेत खेडे, खेड्याशी संबधित कृषिजीवन अभिप्रेत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात १९५२ साली जेव्हा बहिणाबाईंची कविता प्रकाशित झाली तेव्हापासून निसर्ग, शेती, शेतीशी निगडित अवजारे, ऋतू, हवामान, पक्षी, प्राणी, माणूस इत्यादीं विषयींचे चित्रण मराठी ग्रामीण कवितेत येऊ लागले. बहिणाबाई स्वत: कृषिकन्या असल्यामुळे शेती, शेतीची साधने, शेतीतील विविध कामे यांची त्यांना माहिती असल्यामुळे त्यांच्या कवितांमधून कृषिजीवनाचे वास्तव प्रकट होते. पूर्वी शेतातील पिकांना मोटेने पाणी देण्याची पद्धत होती. विहिरीवरची ती धाव, बैल, मोट हाकणारा शेतकरी, मोटेतून येणारे स्वच्छ पाणी इत्यादींना दृश्यरुपात साकार करतात

"येहरीत दोन मोटा
दोन्हीमधी पानी एक
आडोयालो कना, चाक
दोन्हीमधी गती एक"...

"उतरनी-चढनीचे
नाव दोन धाव एक



Scanned with CamScanner

मोट हाकतलो एक
जीव पोसतो कितीक?"

विहिरीत दोन मोटा असल्या तरी दोन मोटेमधले पाणी एक, कना आणि चाक वेगळे असले तरी गती एक, उतरण-चढण नाव दोन पण धाव एक.भिन्न गोष्टीतील एकत्व शोधतात आणि शेवटी मात्र मोट हाकलणारा एक असला तरी अनेकांना पोसण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी आहे. येथे शेतकऱ्याच्या मेहनतीच्या बळावर त्याने पिकविलेल्या धान्यावर अनेक जीव पोसले जातात हे सत्य उलगडून दाखवतात.

शेतकरी आपल्या शेतात धान्य पिकवितो त्या धान्यामुळे अनेक लोकांची भूक भागविली जाते गुरांना चारा मिळतो तसेच पशु पक्षांचीही भूक भागते यातून शेतकऱ्याच्या श्रमाचे गुणगान करताना त्या लिहितात-

"पेरनी पेरनी
अवघ्या जगाच्या कारनी
ढोरांची चारनी
कोटी पोटांची भरनी"

शेतकरी, शेताची मशागत करून मृग नक्षत्रांच्या सरीची (पावसाची) वाट बघत असतो. तो कधी वेळेवर येतो तर कधी हुलकावणी देतो. शेतकऱ्याचे जीवन या पावसावर अवलंबून असते. 'आला पाऊस' या कवितेत पाऊस आल्याची जाणीव करून देतातच शिवाय पावसाकडे मागणंही मागतात.

"आता उगू दे रे शेतं
आला पाऊस पाऊस
वऱ्हे येऊ दे रे रोप
आता फिटली हाऊस"

एक सारखा पाऊस आला तर रोप वर येणार नाही म्हणून हौस फिटली आता शेत उगवू दे, रोप वर येऊ दे असे म्हणतात. 'धरत्रीले दंडवत' या कवितेत शेतकऱ्याला स्वत:च्या कर्तव्याची जाणीव करून देताना म्हणतात-

"काया काया शेतामंधी घाम जिरव जिरव
तव्हा उगलं उगलं कायामधून हिरवं।"

काळ्या शेतात घाम जिरवला कष्ट केले तर हिरवं स्वप्न बघता येईल. या धरतीची माया काही वेगळीच आहे तिला सीमाच नाही सर्व दुनियेचे पोट तिच्यावर अवलंबून आहे. म्हणून या काळ्या मातीचा टिळा कपाळाला लाव तिला दंडवत कर अशी कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात. डॉ.दीपक चिद्दरवार बहिणाबाईच्या कविते विषयी लिहितात- "एखादे चलत चित्र आपल्या डोळ्यांपुढे उभे राहावे त्याप्रमाणे बहिणाबाईच्या काव्यातून दृश्य-चित्र-रूप आणि संवेदनांची अनुभूती एकाच वेळेस अनुभवता येते."[3] 'देव अजब गारोडी' या कवतेत बहिणाबाई लिहितात धरतीच्या कुशीत बी पेरले, कोंब वर आले कोंबातून दोन पान वर आले ते जणू काही ते देवाची करूणा भाकतात की, सर्वत्र आबादानी होऊ दे म्हणतात. ही कल्पनाच मोठी विलक्षण आहे. सर्वत्र आनंदी-आनंद व्हावा सुख-समृद्धी नांदावी ही त्यामागील भावना व्यक्त करीत असताना त्यांना 'देव अजब गारोडी' वाटतो. पाऊस, पेरणी, रोपे, पीक, कापणी, खळे, मळणी, उपणणी इत्यादींचे वर्णन बहिणाबाईच्या कवितेतून येते. शिवाय ही कामे ज्या बैलांच्या भरवशावर होतात. त्या बैला विषयी कृतज्ञता 'पोया' या कवितेत व्यक्त करताना म्हणतात-

"उठा उठा बह्यनाई
चूल पेटवा पेटवा
आज बैलाल नीवद
पुरनाच्या पोया ठेवा"

वर्षभर कष्ट करणाऱ्या बैलाला पोळ्याच्या दिवशी आराम मिळतो पुरणाच्या पोळीचा नैवेद्य दाखवून त्याच्या विषयीचा आदर यातून स्पष्ट होतो. एकूणच बहिणाबाईच्या कवितेतून कृषिजीवनाचे वास्तव प्रकर्षाने जाणवते.

ना.धो.महानोरांची कविता 'रानातली कविता' म्हणूनच उल्लेखिली जाते. निसर्गसंवेदनांची वेगळी अनुभूती देणारी कविता त्यांनी लिहिली. 'रानातल्या कविता' या त्यांच्या पहिल्या कविता संग्रहातूनच एक वेगळी 'रानजाणीव' प्रकट झाली. रानातले रंग, रूप, लावण्याच्या छटा, रानवाऱ्याचा, रानझऱ्याचा नाद, रानफुलांचा गंध इत्यादी संवेदना आविष्कारी होताना दिसतात. त्यांची कविता गावापेक्षा शेतीतील निसर्ग सौंदर्यच अधिक शोधताना दिसते. निसर्ग प्रतिमांच्या माध्यमातून प्रेमजाणिवेचे सूत्र त्यांच्या कवतेत जसे जाणवते तसेच शेती जीवनाची पडझड त्यांची कविता मांडते. 'नभ आणि भुई' या केंद्रीय सूत्रप्रतिमेतून रानशिवाराची जाणीव ते प्रकट करतात.

"ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे"

आकाश-भूमीचे मनोमीलन आणि त्याचे साफल्य इथे व्यक्त होते. या मनोमीलनाच्या साफल्यापूर्तीत एक प्रकारची कृतार्थता आहे. 'गुंतलेले प्राण ह्या रानात माझे' या भावकेंद्राने महानोरांची संबध कविता व्यापली आहे. महानोरांनी आपला रोमॅंटिक मूड जपला असता तरी काही कवितांमधून ग्रामीण जीवनाचे भीषण वास्तव साकार केले आहे.



Scanned with CamScanner

महाराष्ट्रातील एका दुष्काळातील खेड्याचे चित्र 'ग्रीष्माचे उन्ह' या कवितेतून ते रेखाटतात-

'गीष्माचं उन्ह

ग्रीष्माचे उन्ह एकदा खेड्यावर आले

खेडे उदास झाले

घरात असेल तेवढे झोळीत

टाकून स्वत: नागडे झाले'

ग्रीष्मातले उन्ह' या प्रतिमेतून दुष्काळाची भयावहता आणि भेसूरता व्यक्त करतात तसेच ग्रामीण जीवनातील कठोर वास्तवतेची जाणीव करून देतात. शेतकऱ्यांच्या जीवन संघर्षाचे जे विविध पैलू आहेत, त्यात भीषण दुष्काळ परिस्थिती विरूध्द संघर्ष हा त्यांच्या वाट्याला आलेला भोग असतो. अशा परिस्थितीची विदारकता ते साकार करताना दिसतात. पाण्याच्या समस्येमुळे खेड्यातील माणसांचे होणारे हाल पाहून ते करुणाघनाला, निसर्गाला विनवणी करतात.

"पिकपाणी येऊ दे

आबादानी होऊ दे

खेडी खुलू फुलू दे"

शेतकऱ्यांचे जीवन हे पूर्णपणे पावसावर अवलंबून असते आणि हा पाऊस पडावा म्हणून निसर्गाची, दयाघनाची करुणा भाकण्याचा सूर येथे आढळून येतो.

'सुना सोन्याचा पिंपळ' या कवितेत खेड्याच्या उद्ध्वस्त झालेल्या जीवनाचे चित्रण करतात. दुष्काळ पडला आहे पीकं करपली आहे. पशु-पाखरे निघून गेली आहेत चूल पेटत नाही, संसार उद्ध्वस्त झाला. माणसं माणसांपासून दूर गेली.

"उभ्या श्रावणाचा झाला

शुभ्र वैशाखी पारवा

हिर्व जाळून आभाळ

निघालेलं गावोगावा

भुई भेगाळली सारी

कुठे थोडा ना ओलावा

गुराढोरांचा हंबर

तहानेनं व्याकुळावा"

अशा शब्दात उद्ध्वस्त खेड्याचे विनाशकारी चित्र रेखाटले आहे.तसेच शेतकऱ्यांचे काबाडकष्ट, त्यांच्या हालअपेष्टा, दुष्काळ आणि निसर्ग यांच्याशी चाललेला संघर्ष महानोरांच्या कवितेतून येतोच त्या शिवाय राज्यकर्त्यांचे नाकर्तेपण व्यक्त करतात.

"स्वातंत्र्य आलं

सुखाचं हिरवेपण

शहराला गेलं

शेतीच्या आयुष्याला"

गाडगं मडकं आलं'

यातून महानोरांची शेती, शेतकऱ्याविषयीची तळमळ व्यक्त होताना दिसते.

महानोरांच्या कवितेविषयी डॉ.गजानन नामदेव जाधव लिहितात- "महानोरांची कविता ही प्रामुख्याने रोमॅंटिक वळणाची सौंदर्यवादी कविता आहे, असे मानले जात असले तरी त्यांच्या कवितेतून ग्रामीण वास्तव आणि त्यातही शेतकऱ्याचा जीवनसंघर्ष, भरघोसपणे, अत्यंत परिणामकारकरित्या व्यक्त होतो, ही वस्तुस्थिती आहे."[४]

वैदर्भीय कवी डॉ.विठ्ठल वाघ यांच्या कवितेने शेतकऱ्याच्या जीवनाची सर्व स्तरावरील चित्रे स्वाभाविक बोलीतून सहजपणे सजग केली आहेत. 'वावर' या कवितेत वावराबद्दलची अपार श्रध्दा, आत्यांतिक प्रेम, जिव्हाळा व्यक्त होतो. संतांबद्दलचा आदर व्यक्त करीत असतानाच वावरामध्ये संतसामर्थ्य त्यांना गवसते.

'ढगामुचूक अभाय' या कवितेत शेतकरीजीवनात पावसाला फार मोठे स्थान आहे. पावसाच्या संदर्भात काही आखाडे बांधून तो स्वप्न पाहत असतो. "चांदीसारखा कापूस इकू, उजऊ औंदा मोठी धाटी सकू" परंतु प्रत्यक्षात तो आलाच नाही तर-

'ढेकूल नाई मुरलं, बोंड नाई धरलं'

जागच्या जागीच सपन ईरलं' असे स्वप्न उद्ध्वस्त होते.

'ढगामुचूक मुचूक अभाय, कुकू पुसलं कपाय' या ओळीतील कुकू ही प्रतिमा मोठी अर्थपूर्ण आहे.

'तिफन' सारख्या कवितेत विठ्ठल वाघ पेरणीच्या प्रसंगाचे अत्यंत नाट्यपूर्ण वर्णन करतात. काळ्या मातीत तिफन चालत असते त्याचवेळेला विजांचा कडकडाट होत असतो. शेतकरी बैल हाकलित असतो पत्नी पोटाला ओटी बांधून पेरणी करीत असते. दुसरीकडे काठीला बांधलेल्या झोळीत तान्ह मूल रडत असते तरी तिफन थांबत नाही. शेतकऱ्याला आपली कामे वेळच्या वेळी करावी लागतात तेव्हाच ते हिरव स्वप्न बघू शकतात. तिफन चालविणाऱ्या शेतकरी युगुलाचे, त्यांच्या मनातील भावभावनांचे यथातथ्य चित्रण या कवितेत आले आहे. निसर्गातील नाद, रंग, गंध, स्पर्श अशा अनेक संवेदनांचे हे जिवंत चित्रण आहे.'पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते' ही रमणीय प्रतिमा मनात रूतून राहते. तसेच 'सरीवर सरी येती माती न्हाती धुती होते' यातील 'न्हातीधुती' हा उल्लेख सृजनाची सूचक सूचना देऊन जातो. त्याचे सुखदु:ख त्याच्यावर होणारे अन्याय, पिळवणूक या सर्वांचा वेध ही कविता घेते.



Scanned with CamScanner

विठ्ठल वाघांच्या कविते विषयी डॉ.वासुदेव मुलाटे लिहितात- "ग्रामीण जनजीवन या जीवनाचा केंद्रबिंदू असलेला शेती व्यवसाय आणि शेतकरी समाज हा त्यांच्या कवितेचा मुख्य गाभा आहे. शेतकरी त्याचे सुखदुःख त्याच्यावर होणारे अन्याय, पिळवणूक या सर्वांचा वेध ही कविता घेते."[५]

'साहेबराव पाटील' ही विठ्ठल वाघ यांची कविता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या दुःखाची संवेदना प्रकट करणारी आहे. गावातील शिकलेल्या मित्राने आपल्या मृत शेतकऱ्याशी अपराधीभावाने केलेला संवाद या कवितेत आहे. विहिरीचे आटणे, दुष्काळ आणि पाऊसपाण्यावाचून नैराश्य आलेला शेतकरी रक्त ओतून, कष्ट करून सुद्धा त्याच्या हाताशी काहीही येत नाही तेव्हा ईख पचवून तो आत्महत्या करतो. त्याचे प्रेत जळत असताना एक म्हातारा सांगतो-

"आता कापूस जवारी पेरसान त लेक हो
हराम मौतीनं मरसान
आता पेरा तासा तासानं लोखंडी दगडी गोटे
चारी मेरीनं बाभुईचे खम्मन काटे"

असे प्रखर वास्तव आणि विद्रोहाच बीज पेरणारी कविता विठ्ठल वाघ तळमळीने लिहितात. एकूणच विठ्ठल वाघ यांच्या कवितेत कृषी जीवनाचे वास्तव प्रकर्षाने आविष्कृत होताना दिसते.

इंद्रजित भालेराव ग्रामीण कविता समृद्ध करणाऱ्या कवींच्या पैकी एक महत्त्वाचे कवी. त्यांची कविता बदलत्या ग्रामीण समाजजीवनाचा वेध होते. तसेच शेतकऱ्याचे भावविश्व, त्याच्या आशाआकांक्षा, स्वप्ने, त्याच्या जीवनातील अनेक ताणतणाव, प्रश्न, व्यथा, वेदना, त्याच्या जीवनातील मूल्यभाव इत्यादींचा आविष्कार त्यांच्या कवितेत दिसून येतो. भालेरावांची कविता मातीशी, शेतीशी संबधित प्रतिमाप्रतिकांमधून आपल्या भावभावना, अनुभव व्यक्त करते. त्यांच्या कवितेचे मातीशी दृढ नाते आहे, अशी जाणीव कवितेतून व्यक्त होते.

"माझ्या कवितेला यावा
शेना मातीचा दर्वळ
तिने करावी जतन
काट्याकुट्यात हिर्वळ"

अशी भावना ते व्यक्त करतात. तसेचमातीतून जे जे उगवते तेथेच खरा धर्म आहे अशी त्यांची श्रध्दा ही आहे.

'आम्ही काबाडाचे धनी' या दीर्घ कवितेत शेतकऱ्याच्या जीवनाची एक दुःखद कहानीच ते सांगतात. त्यातील दुःख हे मनाला पीक पाडणारे असे आहे. शेतकरी जगत असताना त्याला कोणकोणत्या प्रकारच्या कष्टांना, यातनांना सामोरे जावे लागते, त्याचे अनेक प्रकारे शोषण कसे होत असते, काबाडकष्ट करुनही त्याच्या वाट्याला दारिद्रय हालअपेष्टा कशा येतात इत्यादींचे चित्रण या काव्यात येते. . "भालेरावांच्या कवितेत साध्या सरळ, अत्यंत कष्टाळू, परिस्थितीने गांजलेल्या, शोषित शेतकऱ्याचे चित्र सामान्यतः दिसून येते. हा शेतकरी अनेकदा निसर्गाच्या लहरीपणाचा बळी ठरताना दिसतो. म्हणजे त्याच्या जीवनात जे काही ताण निर्माण होतात ते मूलतः निसर्गामुळे असे येथे सुचित केले जाते"[६] असे डॉ.वसंत पाटणकर म्हणतात. या त्यांच्या विधानाची सार्थता पुढील कवितेत व्यक्त होते.

शेतकऱ्याच्या जीवनात पावसाला महत्त्वआहे. तो वेळच्या वेळी आला तर आनंदी आनंद परंतु सुगीच्या वेळी आला तर त्याच्या मनात धास्ती निर्माण करतो. 'आलं आलं हे आभाळ' या कवितेत तीव्र प्रतिक्रिया समर्थपणे व्यक्त करतात.

"आलं आलं हे आभाळ आलं सुगीच्या दिसांत
माती कालविली त्यानं हातामधल्या घासात"

अशा अस्मानी सुलतानी संकटांना शेतकऱ्यांना समोरे जावे लागते याची भयानकता कवी विशद करतात.

'बाप तुडवितो काटे' यातील बाप हा कष्ट परंपरेचा पाईक आहे. टाचा पंज्यांची कुरुपे ही प्रतीके परंपरागत क्लेशासाठी स्वीकारलेली आहेत. तरीही शेत राखण्याची त्याची धडपड पाहून कारुण्य निर्माण होते. चौघड्याच्या उल्लेखानेही बेभान होऊन सोसण्यांची तयारी त्याची असते.

"बाप तुडवितो काटे। शेत घालाया कुपाटे
टाचा पंज्यांला कुरूप। कसा टिकावा दुरूप
असा आंगो आंगी उले। आग देहभर सले
स्वतः उघडा वाघडा। रानी वाजवी चौघडा"

यातही बाप (शेतकरी) त्याच्या कष्टाचेच वर्णन कवी करतात.

इंद्रजित भालेराव आपल्या मातीवर, शेतावर त्याचप्रमाणेआपल्या आई वडिलांवर प्रेम करतात हे त्यांच्या अनेक कवितांवरून स्पष्ट होते. त्यांच्या कवितेत कृषिजीवनाचे वास्तव मोठ्या प्रमाणात आविष्कृत होताना दिसते.

निवडक कवींच्या निवडक ग्रामीण कवितेचा आढावा घेत असताना ही कविता कृषी जीवनाचे वास्तव प्रकर्षाने रेखाटताना दिसून येते

**निष्कर्ष :-** एकूणच ग्रामीण कवींनी ग्रामजीवन व कृषी जीवनाचे वास्तव मांडले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील अस्मानी सुलतानी संकटांना अधोरेखित करीत त्यांच्या जीवनातील वास्तव



Scanned with CamScanner